**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Volume - 9, Issue - 5, May - 2026
ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 9.134

DOIs:10.2018/SS/202605001 --:-- Research Paper / Article / Review

# "माध्यमिक स्तरावरील सहशालेय उपक्रमात सहभाग न घेण्याच्या कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करणे"

**श्री.गायकवाड आशिष सोमनाथ**
मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बरड
ता- फलटण, जि- सातारा (महाराष्ट्र)
ashishgaikwad.717@gmail.com

**सारांश:** सदर संशोधनाचा उद्देश माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सहशालेय उपक्रमांतील, विशेषतः वक्तृत्व स्पर्धेतील सहभागाचा अभाव का आहे हे शोधून त्यावर योग्य उपाययोजना करणे हा आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाणारे शिक्षण महत्वाचे मानले जाते. मात्र, इ. ९ वी व १० वी चे अनेक विद्यार्थी आत्मविश्वासाच्या अभावामुळे, योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे किंवा मंचभितीमुळे अशा उपक्रमांमध्ये सहभागी होत नाहीत. या समस्येवर प्रकाश टाकण्यासाठी बरड, फलटण येथील मॉडर्न हायस्कूल, बरड या शाळेतील २५ विद्यार्थ्यांवर आधारित वर्णनात्मक व सर्वेक्षणात्मक पद्धतीने हे संशोधन राबवण्यात येणार आहे. संशोधनात मुलाखती, निरीक्षण व प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाईल. संशोधनाच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये सहभाग न घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कारणे शोधणे, त्यांना प्रभावी भाषणासाठी प्रेरित करणे, आत्मविश्वास निर्माण करणे व शाळेच्या सांस्कृतिक दर्जात भर घालणे यांचा समावेश आहे. यामध्ये घेतलेल्या उपाययोजनांमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्याची शक्यता असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्वास संशोधक व्यक्त करतो.

**मुख्य संज्ञा**: सहशालेय उपक्रम, भाषणासाठी, व्यक्तिमत्त्वात, सहभाग.

## 1. प्रस्तावना:

२१ व्या शतकात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर पाठ्यपुस्तकाबरोबरच सहशालेय उपक्रमाची जोड त्याला द्यावी लागेल. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. अफाट अशी माहिती आज क्षणात उपलब्ध होते. त्यामुळे आजच्या शिक्षणाने विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत आत्मविश्वास देखील दिला पाहिजे असे नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये देखील अधोरेखित केले आहे. त्यासाठीच सहशालेय उपक्रमाची तसेच अभ्यासपूरक उपक्रमाची अंमलबजावणी आजच्या शिक्षकाला करावी लागेल.

शाळेत शिकवत असताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे विद्यार्थ्यांचा कमी झालेला आत्मविश्वास. चार भिंतींच्या आत दिले जाणारे शिक्षण हे खरे शिक्षण नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव हा चार भिंतींच्या आत मिळत नाही. व तो मिळणे शक्य नाही. स्वेच्छेने ते स्पर्धेमध्ये भाग घेत नाही. काही विद्यार्थी मंचावर येण्यास संकोच बाळगतात. काहीजन तर कागद समोर ठेवल्याशिवाय बोलू शकत नाही. बोलताना अडखळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सहशालेय उपक्रम राबवणे व त्यात विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेने हे मुख्य उद्दीष्ट असणार आहे.

**2.समस्या विधान:**

"माध्यमिक स्तरावरील सहशालेय उपक्रमात सहभाग न घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कारणांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना करणे."

**3.संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. सहशालेय उपक्रमांमध्ये सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व प्रवृत्ती समजावून घेणे.
२. अशा विद्यार्थ्यांच्या सहभागाच्या अभावामागील मानसिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व शाळाभिमुख कारणांचा अभ्यास करणे.
३. शिक्षक, पालक व शाळेच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
४. अशा विद्यार्थ्यांना सहशालेय उपक्रमांकडे आकर्षित करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**4.संशोधनाची व्याप्ती:**

१. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील मराठी माध्यमातील माध्यमिक स्तरावरील सहशालेय उपक्रमाशी संबंधी आहे.
२. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर केंद्रीत आहे. (इयत्ता ९ वी व १० वी)

**5.संशोधनाची मर्यादा:**

१. सदर संशोधन हे विद्यानिकेतन मॉडर्न हायस्कूल, बरड शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.
२. सदर संशोधांनामध्ये केवळ वकृत्व स्पर्धेचा विचार केला आहे.
३. सदर संशोधांनामध्ये उपक्रमात भाग न घेणाऱ्या मुलांचा विचार केला आहे.
४. सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पुरतेच मर्यादित आहे.
५. सदर संशोधन हे इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

**6.संशोधन प्रश्न:**

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सहशालेय उपक्रमात सहभाग न घेण्यामागची मुख्य मानसिक, सामाजिक, शैक्षणिक व कौटुंबिक कारणे कोणती आहेत?
२. विद्यार्थ्यांचा सहशालेय उपक्रमात सहभाग वाढवण्यासाठी शाळा, शिक्षक व पालक कोणत्या प्रकारचे प्रयत्न करू शकतात?

**7.संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धत वापरण्यात आली आहे. संशोधनासाठी शाळेमधील इयत्ता ९ वी व १० वी मधील विद्यार्थ्यांचा गट निवडण्यात आला.

**माहिती संकलनाची व विश्लेषनाची साधने:**

**प्रश्नावली (Questionnaire):**

विद्यार्थ्यांना उत्तरदायित्वाच्या भावनेने विचारलेले प्रश्न, जसे की त्यांना सहशालेय उपक्रमांमध्ये भाग घेण्याची इच्छा असते का, सहभागी न होण्याची कारणे इत्यादी.

**संवाद व मुलाखती (Interviews):**

शिक्षक, पालक व काही विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या भावना व अनुभव समजून घेण्यात आले.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
**Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal** Impact Factor: 9.134
**Volume - 9, Issue - 5, May - 2026**

**निरीक्षण पद्धती (Observation):**

सहशालेय उपक्रमांच्या वेळी विद्यार्थ्यांचे वर्तन, सहभागाचा दर्जा, उत्साह याचे प्रत्यक्ष निरीक्षण. संकलित माहितीचे विश्लेषण संख्यात्मक आणि गुणात्मक पद्धतीने करण्यात आले.

**नमूना निवड:**

प्रस्तुत संशोधनासाठी फलटण तालुक्यातील मॉडर्न हायस्कूल, बरड येथील इयत्ता ९ वी आणि १० वी मधील एकूण २५ विद्यार्थ्यांची निवड केलेली आहे.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण **संख्यात्मक** आणि **गुणात्मक** या दोन्ही पद्धतींनी केले जाईल.

**संख्यात्मक विश्लेषण:**

१. विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या उत्तरांचे वर्गीकरण करून टक्केवारी, प्रमाण, वारंवारता (frequency) या संख्यात्मक पद्धतीने विश्लेषण केले जाईल.
२. उदा. किती विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाचा अभाव हे प्रमुख कारण दिले, किती विद्यार्थ्यांना पालकांचा पाठींबा नाही, इ. यांचे आकडेवारी स्वरूपात सादरीकरण.
३. संगणकीय साधनांच्या साहाय्याने (Excel Sheets) बार चार्ट्स, पाई चार्ट्स, टेबल्स तयार करून विश्लेषण सादर करता येईल.

**गुणात्मक विश्लेषण:**

१. मुलाखती व संवादातून मिळालेल्या उत्तरांचे विषयानुसार वर्गीकरण करून अर्थनिर्वचन केले जाईल.
२. उदा. विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेले अनुभव, भावना, अडथळे, अपेक्षा यांचा आशय विश्लेषण करून निष्कर्ष काढता येतील.
३. शिक्षक व पालकांचे दृष्टिकोन कोणत्या मुद्द्यांवर केंद्रित आहेत याचे विश्लेषण करून त्यातून समस्येची खोली व उपाययोजना ठरवता येतील.

**अर्थनिर्वचन:**

१. संख्यात्मक व गुणात्मक माहितीच्या आधारे सहशालेय उपक्रमात सहभाग न घेण्यामागील प्रमुख कारणांची यादी करणे.

२. कोणती कारणे सर्वसाधारणपणे जास्त प्रमाणात आढळतात, कोणत्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात यावर आधारित निष्कर्ष मांडणे.

३. या निष्कर्षांवर आधारित शाळा, शिक्षक व पालकांसाठी उपयोगी ठरणाऱ्या शिफारसी तयार करता येतील.

**8.संशोधनाचे निष्कर्ष:**

१. विद्यार्थ्यांचा सहभाग कमी असण्यामागे अनेक परस्परसंबंधित कारणे दिसून येतात. त्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव, उपहासाची भीती, स्पर्धेची भीती, आणि अपयश सहन न करण्याची भीती ही मानसिक कारणे प्रमुख आहेत.
२. पालकांचा पाठिंबा व सहभाग आवश्यक आहे. अनेक पालक सहशालेय उपक्रमांना 'वेळेचा अपव्यय' समजतात आणि केवळ गुणांच्या मागे लागतात यामुळे .शिक्षकांकडून प्रोत्साहन आणि मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. सर्व शिक्षक

विद्यार्थ्यांना उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी समान संधी देतातच असे नाही काही वेळा विशेष विद्यार्थ्यांनाच . .संधी दिली जाते

३. शाळेतील सहशालेय उपक्रमांची रचना सर्वसमावेशक नसते. जे विद्यार्थी सामाजिकदृष्ट्या लाजरे किंवा धीम्या गतीने शिकणारे आहेत, त्यांच्यासाठी उपयुक्त व आकर्षक अशा संधी उपलब्ध नसल्याने ते सहभागी होत नाहीत.
४. उपक्रमांची माहिती आणि तयारीसाठी वेळ व साधनांची कमतरता देखील कारणीभूत ठरते. काही विद्यार्थ्यांना स्पर्धा, कार्यक्रम याविषयी योग्य माहिती, तयारीसाठी वेळ किंवा साहित्य उपलब्ध नसते.
५. विद्यार्थ्यांमध्ये सहशालेय सहभाग वाढवण्यासाठी मानसिक तयारी, समुपदेशन, आणि सकारात्मक वातावरणाची गरज आहे. प्रेरणादायी उदाहरणे, सरावाची संधी, शिक्षक व पालक यांची सकारात्मक भूमिका या घटकांचा सहभाग वाढवण्यासाठी उपयोग होतो.

**9.समारोप:**

प्रस्तुत संशोधनातून असे आढळून आले की माध्यमिक स्तरावर अनेक विद्यार्थी सहशालेय उपक्रमात सहभाग घेत नाहीत, आणि त्यामागे मानसिक, सामाजिक, कौटुंबिक व शालेय घटक कारणीभूत असतात. आत्मविश्वासाचा अभाव, अपयशाची भीती, पालकांचे अल्प सहकार्य व शिक्षकांचे मर्यादित प्रोत्साहन यामुळे सहभाग कमी होतो.

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी सकारात्मक वातावरण, योग्य मार्गदर्शन व प्रेरणा देणे गरजेचे आहे. शाळा, शिक्षक व पालक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांचा सहभाग वाढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकते.

**संदर्भ ग्रंथ:**

१. देशमुख पी. ए. (२०१७) शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : नूतन प्रकाशन
२. जोशी एस. व्ही. (२०१५) शाळा व्यवस्थापन व गुणवत्ता विकास, कोल्हापूर : बालचंद्र प्रकाशन
३. कुलकर्णी डी. एम. (२०१९) शाळा व्यवस्थापन व गुणवत्ता विकास, मुंबई : साईनाथ प्रकाशन
४. आपटे व्ही. के. (२०१६) शिक्षणतत्व व शिक्षणप्रक्रिया, नागपुर : यूनिवर्सल पब्लिकेशन
५. बोराडे एम. एस. (२०२०) विद्यार्थी व पालक यांचे मानसशास्त्र, पुणे : प्रगती बुक्स
६. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) (२०२१) Adolescence Education Programme, New Delhi : NCERT Publication
७. रमेश ठाकुर (२०१८) Co-curricular Activities and Student Development, New Delhi : Regal Publication
८. Bhatt P. & Sharma R. (२०२०) Effective School Leadership & Co-curricular Planning, New Delhi : APH Publishing Corporation
९. NCF (२००५) National Curricular Framework, New Delhi : NCERT
१०. Web References:
- https://www.education.gov.in
- https://www.ncert.nic.in
- https://www.unesco.org
- https://www.shodhganga.inflibnet.ac.in/